# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

जा.क्र./महा.वि./गो.वि./ ९०४ /२०१७ दिनांक : ०३/०६/२०१७

## :: परिपत्रक ::

विषय:— बी. एड., एम.एड., बी.पी.एड. एम.पी.एड. विधी ३ व ५ वर्षीय अभ्यासक्रम प्रथम वर्ष २०१७—१८च्या केंदीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी महाविद्यालयांच्या नाव नोंदणीबाबत.

संदर्भ :—मा. शिक्षण संचालक यांचे पत्र क्र. उशिस/विधी/कॅप/प्र.क्र. ०१—२०१७/सीईटीसेल/६४६ दि. ३१ मे,२०१७

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित बी.एड.,एम.एड. ,बी.पी.एड. एम.पी.एड. विधी ३ व ५ वर्षीय अभ्यासक्रम असलेल्या महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०१७—१८ च्या केंदीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी महाविद्यालयाच्या नाव नोंदणीबाबत. सोबत जोडलेल्या सहपत्रानुसार कार्यवाही घेण्यात यावी.

Milhare

डॉ. व्ही. सी. सिल्हारे
प्र. उपकुलसचिव
महाविद्यालय विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५
फोन नंबर ०७१३२—२१६५९४ **E-Mail** : arcollegesectiongug48@gmail.com

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
विद्या विभाग
आवक क्र. 745 दि. 2/06/2017
जावक क्र. ...... दि. ..........

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 3191 दि. 2/6/17

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९,२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६११११५३

क्रमांक-उशिसं/विधी/कॅप/प्र.क्र.०१-२०१७/सीईटीसेल/ ६४६८ दिनांक : 31 MAY 2017

**परिपत्रक -**

**विषय : बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., विधी ३ व ५ वर्षीय अभ्यासक्रम प्रथम वर्ष २०१७-१८ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी महाविद्यालयांच्या नाव नोंदणीबाबत.**

संदर्भ : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे पत्र क्र. रासाप्रपक/ उच्च शिक्षण/ केंद्रीय प्रवेश प्रक्रिया -२०१७-१८/२०१७, दिनांक १५.०५.२०१७.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी राज्यातील शासकीय/ अशासकीय अनुदानित/ अशासकीय अनुदानित अल्पसंख्यांक/ विद्यापीठ संचलित /विना अनुदानित/ कायम विना अनुदानित अल्पसंख्याक/ कायम विना अनुदानित तत्वावर सुरू असणाऱ्या बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., विधी ३ व ५ वर्षीय अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष सन २०१७-१८ करिताच्या प्रवेशासाठीची केंद्रीभूत प्रक्रिया राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेद्वारे लवकरच सुरु करण्यात येत आहे.

अ) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सन २०१७-१८ मध्ये सहभागी होण्यासाठी महाविद्यालयांनी http://dhe.mhpravesh.in या संकेतस्थळावर महाविद्यालयांची ऑनलाईन नाव नोंदणी करावी. महाविद्यालयांनी अभ्यासक्रमनिहाय स्वतंत्रपणे नाव नोंदणी करणे आवश्यक राहील. **केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभाग घेवू इच्छिणाऱ्या महाविद्यालयांनी आवश्यक माहिती अचूकपणे दि. ०८.०६.२०१७ ते दि. १५.०६.२०१७ या कालावधीमध्ये उपरोक्त संकेतस्थळावर भरावयाची आहे.**

ब) उपरोक्त नमूद संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केलेनंतर त्यासोबत खालीलप्रमाणे नमूद सहपत्रे / मान्यता पत्रे जोडण्यात यावीत.

१. नाव नोंदणी करणाऱ्या महाविद्यालयांनी महाविद्यालय सुरु करण्यास असलेली शासन मान्यता तसेच महाविद्यालयामध्ये एकापेक्षा जास्त तुकडी असतील तर सदरहू अतिरिक्त तुकडी सुरु करणेसाठी असलेली शासन मान्यतेची प्रत प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.

( कृ. मा. प. )

शिक्षणशास्त्र / BEE

D:\Sandip\LAW\2017-18\C.R.No. 01-17.docx 5

उपकुलसचिव (प.वि.),
गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत उपरोक्त प्रमाणे शिक्षण व विधी महाविद्यालयात माहितीस्तव पाठवावे - 2/6/2017

२. सन २०१७-१८ करिता संबंधित विद्यापीठाचे संलग्निकरण असल्याचे पत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. ( संलग्निकरण पत्र उपलब्ध नसल्यास पृ.क्र.३ वर दिल्याप्रमाणे प्रमाणपत्र जोडण्यात यावे.)

३. अल्पसंख्याक महाविद्यालयाने ५० टक्के अल्पसंख्यांक कोटा किंवा कोटयाच्या काही जागा केंद्रिय प्रवेश प्रक्रियेला समर्पित करणार असेल तर त्याबाबतचा प्रस्ताव या संचालनालयास सादर करावा व प्रत आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, अली यावर जंग मार्ग, बांद्रा, मुंबई - ५१ यांना देण्यात यावी.

४. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होवू इच्छिणारे विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयांनी प्रति तुकडी रु. १०००/- रकमेचा राष्ट्रीयीकृत बँकेचा डी. डी. Commissioner, CET CELL, Mumbai ( Payable at - Mumbai) यांचे नावे काढण्यात यावा.

५. सर्व शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण शास्त्र महाविद्यालयांनी महाविद्यालयास NCTE ची मान्यता असल्याचे सुधारित पत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

६. सर्व विधी महाविद्यालयांनी त्यांचे महाविद्यालयास भारतीय विधिज्ञ परिषद नवी दिल्ली यांची सन २०१६ पर्यंत मान्यता असल्याचे मान्यता पत्र सोबत जोडण्यात यावे.

७. सर्व महाविद्यालयांनी सोबतच्या परिशिष्टांमध्ये अचूक माहिती नमूद करावी.

८. ऑनलाईन अर्जामध्ये मोबाईल क्रमांक व ई-मेल आय डी हा अचूकपणे नमूद करण्यात यावा, यापूढे सर्व माहिती व सुचना या आपण अर्जामध्ये नमूद केलेल्या ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांकावरच आपणास कळविण्यात येतील.

**क) आपल्याला विदीत आहे की, बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., विधी ३ व ५ वर्षीय अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने राबविली जात आहे. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांकडून पहिल्या तीन राउंडसाठी एकदाच विकल्प (Option) फॉर्म भरले जातात. त्यामुळे प्रक्रियेत सुरुवातीला ज्या महाविद्यालयांची नोंदणी ऑनलाईन होईल तीच महाविद्यालये विकल्प (Option) देण्यासाठी विद्यार्थ्यांना उपलब्ध होतील. सबब, विहित मुदतीमध्ये म्हणजेच दि. १५.०६.२०१७ पुर्वीच महाविद्यालयाची ऑनलाईन नोंदणी होणे अत्यावश्यक आहे, याची नोंद घ्यावी.**

ड) ज्या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी विद्यापीठाचे संलग्निकरण प्राप्त झालेले नाही, त्यांनी विद्यापीठाच्या सक्षम अधिकाऱ्यांचे खालील आशयाचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत सादर करावे. ( विद्यापीठाचे सन २०१७-१८ करिता संलग्निकरण पत्र अथवा सोबतचे प्रमाणपत्र सोबत नसल्यास आपल्या महाविद्यालयाचे नाव केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी करण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.)

( ...३/-)

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, ..........................................................................................
या महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी संलग्निकरण देण्याची बाब विद्यापीटाच्या विचाराधीन आहे. या महाविद्यालयात ......... मान्य तुकडया असून प्रवेश क्षमता ......... एवढी आहे. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी सदरहू महाविद्यालयातील बी.एड./ एम.एड./ बी.पी.एड./एम.पी.एड/ विधी ३ वर्ष/ विधी ५वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरिता एकूण .......... विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी विद्यापीठाची शिफारस आहे.

**इ)** बी.एड., एम.एड., बी.पी.एड. आणि एम.पी.एड. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया ही शासन अधिसूचना उच्च व तंत्रशिक्षण विभाग, असाधारण क्रमांक ११३ दि, ५ मे, २०१७ व शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. सीईटी-२०१७/प्र.क्र.१२५/मशि-२, दि. १२.०५.२०१७ अन्वये राबविण्यात येईल. त्याचप्रमाणे विधी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया शासन अधिसूचना उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दिनांक ०५ मे, २०१७ व शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. सीईटी-२०१७/प्र.क्र.१२४/मशि-२, दि. १२.०५.२०१७ अन्वये राबविण्यात येईल.

http://dhe.mhpravesh.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केलेनंतर अर्जाची साक्षांकित प्रत व त्यासोबतची आवश्यक सहपत्रे / मान्यता पत्रे जोडून ती या संचालनालयास **दि. १७.०६.२०१७** पर्यंत पोहोचेल अशा पध्दतीने पाठविण्यात यावीत. शक्यतो सदरहू सहपत्रे खास दूताकरवी संचालनालयास हस्तपोच करण्यात यावीत. विहीत मुदतीमध्ये आपला प्रस्ताव संचालनालयास प्राप्त न झाल्यामुळे आपल्या महाविद्यालयाचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

**( डॉ. धनराज माने )**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत -

१. प्राचार्य, बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., विधी ३ व ५ वर्षीय अभ्यासक्रमाची सर्व महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी.
३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
   २/- आपल्या विद्यापीठ क्षेत्रातील सर्व बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., विधी ३ व ५ वर्षीय अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना सदर परिपत्रक निर्गमित करावे.

( ...४/-)

४. श्री. मोहन ठोंबरे, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे यांना माहिती तथा तात्काळ उचित कार्यवाहीसाठी.

२/- सन २०१७-१८ या वर्षी सुरु होणाऱ्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेसंबंधिचे सदरचे परिपत्रक केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याबाबत योग्य कार्यवाही करावी

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर

२. मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ३०५ शासकीय तंत्रनिकेतन, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

**केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सन २०१७-१८**

शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी

संस्थेचे नाव ( लागू असल्यास ) :

महाविद्यालयाचे नाव व पत्ता :

प्राचार्यांचे नाव :

इ-मेल आय डी :

भ्रमणध्वनी क्रमांक :

महाविद्यालयाचा संपर्क क्रमांक :

अभ्यासक्रम : बी.एड./ एम.एड./ बी. पी. एड./ एम.पी. एड./

| अ.क्र. | महाविद्यालयास शासन मान्यता पत्र क्र. | दिनांक | विद्यापीठाचे संलग्नता पत्र क्र. | दिनांक | NCTE मान्यता पत्र क. | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

अतिरिक्त तुकडी असल्यास

| अ.क्र. | अतिरिक्त तुकडीस शासन मान्यता पत्र क्र. | दिनांक | विद्यापीठाचे संलग्नता पत्र क्र. | दिनांक | NCTE मान्यता पत्र क. | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

प्राचार्यांची सही

## केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सन २०१७-१८

विधी महाविद्यालयांसाठी

संस्थेचे नाव ( लागू असल्यास ) :

महाविद्यालयाचे नाव व पत्ता :

प्राचार्यांचे नाव :

इ-मेल आय डी :

भ्रमणध्वनी क्रमांक :

महाविद्यालयाचा संपर्क क्रमांक :

अभ्यासक्रम : विधी ३ वर्ष / विधी ५ वर्ष

| अ.क्र. | महाविद्यालयास शासन मान्यता पत्र क्र. | दिनांक | विद्यापीठाचे संलग्नता पत्र क्र. | दिनांक | BCI मान्यता पत्र क. | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

अतिरिक्त तुकडी असल्यास

| अ.क्र. | अतिरिक्त तुकडीस शासन मान्यता पत्र क्र. | दिनांक | विद्यापीठाचे संलग्नता पत्र क्र. | दिनांक | BCI मान्यता पत्र क. | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

प्राचार्यांची सही

टिप -एकापेक्षा जास्त अतिरिक्त तुकडी असल्यास सदरहू तुकडीची स्वतंत्रपणे माहिती नमूद करण्यात यावी.